F/GAD1/Aadesh – Pariptrak/742

"सुधारीत आदेश"

जा.क्र.नांवाशमनपा/साप्रवि/ /2017

नांदेड वाघाळा-शहर महानगरपालिका, नांदेड

दिनांक :- 14 DEC 2017

विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत सहाय्यक जनमाहिती अधिकारी /जनमाहिती अधिकारी/अपिलीय अधिकारी यांची नियुक्ती करणे बाबत.

संदर्भ :- कार्यालयीन आदेश क्र.जा.क्र.नांवाशमनपा/साप्रवि/5711/17 दि.25.07.2017

उपरोक्त विषयांकीत प्रकरणी संदर्भीय आदेशान्वये केंद्र शासनाच्या माहितीचा अधिकार 2005 अंतर्गत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत विविध विभागाची माहिती देण्यासाठी सहाय्यक जनमाहिती अधिकारी/जनमाहिती अधिकारी/अपिलीय अधिकारी यांचे नियुक्तीबाबत आदेश निर्गमीत करण्यात आलेले असुन, सदर आदेशान्वये नगररचना विभाग, मनपा नांदेड या विभागात प्राप्त होणा-या माहितीच्या अधिकार अर्जावर निर्णय घेण्यासाठी सहाय्यक जनमाहिती अधिकारी/जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी म्हणुन खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली होती.

| अ.क्र. | विभागाचे नांव | सहाय्यक जनमाहिती अधिकारी | जनमाहिती अधिकारी | अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| 1 | नगररचना विभाग | कनिष्ठ अभियंता/प्र.नगररचनाकार | सहा.संचालक नगररचनाकार | उपआयुक्त(प्रशासन) |

तथापि उपआयुक्त(प्रशासन) तथा प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडील कामाच्या व्यापामुळे प्रशासकीय कारणास्तव उपरोक्त विवरणातील नियुक्त अपिलीय अधिकारी आदेशात अंशतः बदल करणे अपेक्षित आहे.

त्यानुषंगाने संदर्भीय आदेशामध्ये मर्यादीत अंशतः बदल करुन खालीलप्रमाणे सहाय्यक जनमाहिती अधिकारी/जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र. | विभागाचे नांव | सहाय्यक जनमाहिती अधिकारी | जनमाहिती अधिकारी | अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| 1 | नगररचना विभाग | कनिष्ठ अभियंता | नगररचनाकार | सहा.संचालक नगररचनाकार |

करिता वरीलप्रमाणे झालेल्या अंशतः बदलांची नोंद सबंधित विभागप्रमुखांनी घ्यावी, तसेच इतर नियम, अटी व शर्ती पुर्वीच्याच आदेशाप्रमाणे लागु राहतील.

सदरील आदेशाची अंमलबजावणी तात्काळ परिणामाने व्हावी.

स्वाक्षरीत/-

आयुक्त,

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

प्रतिलिपी माहितीस्तव सविनय सादर –

उपसचिव,राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद

प्रतिलिपी माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव:

1) संबंधित सहाय्यक जनमाहिती अधिकारी/जनमाहिती अधिकारी/अपिलीय अधिकारी, मनपा नांदेड

2) भांडार अधिक्षक, मनपा नांदेड यांना देऊन आदेशित करण्यात येते की, सदर आदेशानुसार झालेल्या अंशतः बदलाची नोंद बॅनर बनवितांना घ्यावी.

3) सिस्टीम मॅनेजर, संगणक विभाग, मनपा नांदेड यांना सुचित करण्यात येते की, सदर आदेशातील अंशतः बदलाची नोंद मनपा संकेतस्थळावर घेण्यात यावी.

आयुक्त,

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड